

पोर्तुगीज-मराठा संबंधावर सर्वप्रथम प्रकाश टाकणारे,
थोर इतिहास संशोधक, देशाभिमानी,
गोव्याचे महामहोपाध्याय
डॉ. पांडुरंग सखाराम शेणवी पिसुर्लेकर
यांची १२५ वी जयंती व ५० वी पुण्यतिथीचे निमित्ताने...

प्रस्तुत स्मारक ग्रंथाचे तीन भाग असून

पहिल्या भागात डॉ. पिसुर्लेकरांनी काय हालअपेष्टा सहन करून आपले संशोधनकार्य केले, याची माहिती व्हावी म्हणून त्यांच्यावरील ४ चरित्रात्मक लेख आहेत.

दुसऱ्या भागात डॉ. पिसुर्लेकर यांचे २२ दुर्मिळ लेख आहेत.

आणि तिसऱ्या भागात डॉ. पिसुर्लेकर यांच्या १३९ ग्रंथ व लेखांचा सारांश दिलेला आहे.

''मी जे कागदपत्र (जगभरातून) जमविले, ज्याच्या प्रती मी उतरून काढल्या, ज्याच्या मी फिल्म्स् काढून ठेवल्या, त्या सर्व मुंबई विद्यापीठाच्या पणजीच्या केंद्रात ठेवल्या आहेत. एकही कागदाचा कपटा आता मी घरी ठेवलेला नाही. जे साहित्य मी जमविले आहे. त्याचा उपयोग नव्या पिढीनें करावा.''

– डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

9 788194 216506
ISBN : 978-81-942165-0-6
Dr. Pandurang Pisurlekar Smarak Granth (Paperback) ₹ 400

संपादक – अनिकेत अंकुश यादव

डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ

डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ

Dr. PANDURANG PISSURLENCAR COMMEMORATION BOOK



संपादक – अनिकेत अंकुश यादव

डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ

Dr. PANDURANG PISSURLENCAR

COMMEMORATION BOOK

✼ संपादक ✼

अनिकेत अंकुश यादव

डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ

Dr. PANDURANG PISSURLENCAR COMMEMORATION BOOK

संपादक – अनिकेत अंकुश यादव

Editor - Aniket Ankush Yadav

पत्ता – ४१७, शुक्रवार पेठ, खडक पोलीस स्टेशन समोर,
शिवाजी रोड, पुणे – ४११००२, महाराष्ट्र, भारत.
Mob. 7588291483, 9822743244,
Email - aniketyadav84@gmail.com

पहिली आवृत्ती– दि. ३० मे २०१९ (डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांची १२५ वी जयंती)

दुसरी आवृत्ती – दि. १० जुलै २०१९ (डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांची ५० वी पुण्यतिथी)

तिसरी आवृत्ती – दि. ३० मे २०२२ (डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांची १२८ वी जयंती)

प्रकाशक – **अनिकेत एंटरप्रायझेस**
Address - 417, Shukrawar Peth, Opp. Khadak Police
Station, Shivaji Road, Pune - 411002, Maharashtra, India.
Mob. 7588291483, 9822743244.
Email - aniketyadav84@gmail.com

मुद्रक – **न्यू भारत प्रिंटर्स अँड बायंडर्स,** नारायण पेठ, पुणे ४११०३०.

मुखपृष्ठ चित्र – **सागर साळुंके**

मुखपृष्ठ मांडणी– **माणिक काळे**

किंमत – **रु. ४००/–**

ISBN No.- 978-81-942165-0-6 (Paperback)
978-81-942165-1-3 (E-Book)

–: अर्पणपत्रिका :–



"Cujus regio illius religio" अर्थात, **'ज्यांचे राज्य त्यांचा धर्म'**

अशा धर्मांध वृत्तीने वागणाऱ्या जुलमी राज्यकर्त्यांविरूद्ध लढणाऱ्या

छत्रपती शिवाजी महाराज

यांना आदरपूर्वक अर्पण.....

डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ

Dr. PANDURANG PISSURLENCAR COMMEMORATION BOOK

✻ अनुक्रमणिका ✻

इंग्रजी विभाग

PART 3

❊ तिसऱ्या आवृत्तीचे निमित्ताने ❊

दि. ३० मे २०१९ रोजी डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. दि. १० जुलै २०१९ रोजी डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांच्या ५० व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने स्मारक ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्यात आली.

दरम्यानच्या काळात जवळपास २ वर्षे कोरोनाने थैमान घातले होते. या काळात मात्र मी माझे गुरू 'दुर्गमहर्षी' कै. प्रमोद मांडे यांची काही अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याच्या कामात गुंतून गेलो होतो. पैकी "FORTS & PALACES IN INDIA : Encyclopedia of 4000+ Forts & Palaces across India" हा ७८० पृष्ठांचा, अडीच किलो वजनाचा जाडजूड ग्रंथ दि. ६ नोव्हेंबर २०२० रोजी प्रसिद्ध केला. या ग्रंथामध्ये भारतातील २६ राज्ये, ६ केंद्रशासित प्रदेश व ५२१ जिल्ह्यांमधील ४०८८ किल्ल्यांचा समावेश आहे. याशिवाय या ग्रंथात १२८२ रंगीत फोटो, ३३ नकाशे तसेच प्रत्येक किल्ल्याचा अक्षांश, रेखांश, त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची, जिल्ह्याच्या मुख्यालयापासून किल्ल्याचे अंतर व दिशा, किल्ल्याची सद्यस्थिती, त्यावरील वास्तू, त्याचा थोडक्यात इतिहास, किल्ल्याच्या आजूबाजूची प्रेक्षणीय ठिकाणे इत्यादी माहिती दिलेली आहे. ४३ हून अधिक प्राचीन ग्रंथांमधील किल्ल्यांबाबतची माहिती देखील या ग्रंथांत दिलेली आहे. हडप्पा, मोहेंजोदरो यांपासून भारताच्या गौरवशाली परंपरेचे प्रतिक असणाऱ्या प्राचीन किल्ल्यांचे वर्णन यात केलेले आहे.

याशिवाय **'आझादी के दिवाने'** हा ४७६ पृष्ठांचा ग्रंथ 'दुर्गमहर्षी' कै. प्रमोद मांडे यांचे जन्मदिनी, म्हणजेच दि. १८ डिसेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. या ग्रंथामध्ये १४६ क्रांतिकारकांचे माहितीसह फोटो, ८०० हून अधिक क्रांतिकारकांचे दुर्मिळ फोटो, ४००० हून अधिक क्रांतिकारकांच्या नावांची यादी व माहितीपूर्ण परिशिष्टे इत्यादींचा समावेश आहे.

या ग्रंथांच्या कामांबरोबरच मराठा आरमार व इतिहासावरील माझे लेखन व व्याख्याने सुरूच होती. डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ २०१९ मध्ये प्रकाशित झाल्यापासून पिसुर्लेकरांचे काही लेख मिळत होते. डॉ. पिसुर्लेकरांच्या नव्याने मिळालेल्या ५ लेखांचे सारांश मी दुसऱ्या आवृत्तीत घेतले होते. ते ५ लेख पुढीलप्रमाणे – (१) 'शिवाजी व पोर्तुगीज यांजमध्ये झालेला तह : सन १६६७', (२) 'बाजीराव आणि पोर्तुगीज', (३) 'गोवा बेटातील देवालये केव्हा व कोणी पाडली?', (४) 'गोमंतकातील मराठी भाषेची परंपरा', (५) 'मराठ्यांच्या काही आरमारी लढाया'.

हे पाचही लेख वाचकांच्या माहितीसाठी या तिसऱ्या आवृत्तीत मी संपूर्णपणे टाईप करून दिले आहेत. याशिवाय डॉ. पिसुर्लेकरांचा 'गोव्याचे ख्रिस्तीकरण' हा प्रदिर्घ

लेख देखील या आवृत्तीत घेतला आहे. गोव्यातील जनतेने पोर्तुगीजांचे धार्मिक अत्याचार कसे सहन केले आणि गोव्याचे ख्रिस्तीकरण कसे झाले, हे या लेखात डॉ. पिसुर्लेकरांनी सोदाहरण स्पष्ट केले आहे. त्यामुळेच हा लेख अत्यंत वाचनीय असा आहे. तसेच 'शिवाजी महाराजांचा एक पोर्तुगीज चरित्रकार', 'श्रीमद्भगवद्गीता आणि फ्रेंच पण्डित पार्रो', 'भारतपुत्र आबे द फारीय', 'मराठ्यांचे आरमार' व 'गेल्या २५ वर्षांतील इतिहास संशोधन' हे लेख देखील या आवृत्तीत वाचकांच्या माहितीसाठी दिले आहेत. वाचकांना व अभ्यासकांना त्याचा निश्चितच लाभ होईल. गेल्या २५ वर्षांतील इतिहास संशोधन या लेखात डॉ. पिसुर्लेकरांनी स्वतः लिहून ठेवलेल्या लेखांची एक यादीच दिली आहे. पोर्तुगीज भाषेतून मराठी भाषांतर करताना काही लेखांचे शिर्षक माझ्याकडून चुकले होते, या यादीमुळे त्यात दुरूस्ती करता आली. याशिवाय या लेखामध्ये नमूद 'दुसऱ्या मुर्तिजा निजामशहाचे वय' हा लेख देखील मला नव्याने आढळला.

अशाप्रकारे प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या भागात डॉ. पिसुर्लेकरांवरील ३ मराठी व १ इंग्रजी असे ४ चरित्रात्मक लेख आहेत. ग्रंथाच्या दुसऱ्या भागात पिसुर्लेकरांनी लिहीलेले १३ मराठी व ९ इंग्रजी असे २२ लेख घेतलेले आहेत. तर तिसऱ्या भागात १३९ ग्रंथ/ लेखांचे सारांश दिलेले आहेत.

ब्रिटीश लायब्ररीने डॉ. पिसुर्लेकर यांचे काही लेख स्कॅनिंग करून जतन करून ठेवले आहेत, त्याबद्दल त्यांचे किती आभार मानावेत तेवढे कमीच आहेत. जुन्या व दुर्मिळ कागदपत्रांचे महत्त्व त्यांनी फार पूर्वीच ओळखल्याचे यातून अधोरेखित होते. हा गुण आपल्या ग्रंथालयांनी, ग्रंथसंग्रहकांनी घ्यायला हवा. ब्रिटीश लायब्ररीतून मलाही काही लेख मिळाले. 'Hindu Medicine in Goa in the 16th and 17th Centuries' हा लेख मी या आवृत्तीत घेतला आहे. तसेच श्री. सुरेश शिखरे (कोल्हापूर), श्री. दीपक पटेकर यांनी देखील डॉ. पिसुर्लेकरांचे काही लेख मला तत्परतेने पाठविले, त्यांचा मी फार फार आभारी आहे. अभ्यासक व संशोधक श्री. निखील बेल्लारीकर, कु. मानसी वडके, माझी पत्नी सौ. अंजली, न्यू भारत प्रिंटर्स अँड बायंडर्सचे श्री. प्रभाकर मारणे व श्री. मुकुल मारणे यांचेही आभार.

पहिल्या आणि दुसऱ्या आवृत्तीबरोबरच याही सुधारीत तिसऱ्या आवृत्तीचे वाचक स्वागत करतील, अशी खात्री बाळगतो. धन्यवाद !

पुणे, महाराष्ट्र. दि. ३० मे २०२२,
डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांची १२८ वी जयंती.

– अनिकेत अंकुश यादव

❊ दुसऱ्या आवृत्तीचे निमित्ताने ❊

दि. ३० मे २०१९ रोजी डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ प्रकाशित झाला. पुस्तक प्रसिद्ध करण्याची ही माझी पहिलीच वेळ. यातून मला पुस्तकाची छपाई, त्याचे वितरण, विक्री व्यवस्था, ई बुक, आय.एस.बी.एन. वगैरे प्रक्रिया समजून आली. नवीन गोष्ट शिकण्याची माझी इच्छा याद्वारे पूर्ण झाली. ग्रंथ प्रकाशनाची बातमी दै. लोकमत (पुणे व गोवा), महाराष्ट्र टाईम्स, पुढारी, लोकसत्ता, नवप्रभा (गोवा) येथील वृत्तपत्रांमध्ये फोटोसह प्रसिद्ध झाली. याशिवाय डॉ. पिसुर्लेकर यांच्या कार्यावर लिहीलेला माझा लेख दै. लोकमत, दै. महाराष्ट्र टाईम्स व दै. नवप्रभा यांनी प्रसिद्ध केला.

पुणे विद्यापीठाने डॉ. पिसुर्लेकरांचे 'पोर्तुगेज–मराठे संबंध' हे एकमेव मराठी पुस्तक पुर्नप्रकाशित तर केले होते. मात्र ते विक्रीस उपलब्ध झालेले नव्हते. त्यामुळे दि. २६ जून २०१९ रोजी कुलगुरू मा. नितीन करमळकर यांची मी समक्ष भेट घेतली. पुन्हा एकदा त्यांना पुस्तक उपलब्ध होणेबाबत विनंती केली. गोवा व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, गोवा व पुणे विद्यापीठ, गोवा पुराभिलेख विभाग, भारत इतिहास संशोधक मंडळ, इंडियन हिस्ट्री काँग्रेस इत्यादी डॉ. पिसुर्लेकरांशी संबंधित संस्थांना पिसुर्लेकरांवरील कार्यक्रम घेण्याविषयी मी विनंती केली होती. पैकी भारत इतिहास संशोधक मंडळाने पिसुर्लेकरांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने २ व्याख्यानांचे आयोजन केले होते. गोवा सरकार व पुराभिलेख विभागाने पिसुर्लेकरांच्या कार्याविषयीचा संशोधनात्मक लेखांचा समग्रखंड करण्याचे ठरविले होते. मात्र माझ्याखेरीज कोणाचाही लेख न आल्यामुळे हा खंड पूर्णत्वास येऊ शकला नाही, याचे वाईट वाटते.

स्मारक ग्रंथाची पहिली आवृत्ती मिळाल्यानंतर पुण्यातील तरूण इतिहास अभ्यासक श्री. दीपक पटेकर यांनी 'मराठ्यांच्या काही आरमारी लढाया' हा सह्याद्री मासिकातील पिसुर्लेकरांचा लेख मला पाठविला. त्यामुळे त्यांचे आभार मानतो. माझा मित्र संदिप रेमजे व हा ग्रंथ पूर्णत्वास येण्यासाठी अनेक थोरामोठ्यांचे हातभार लागले, त्या सर्वांचे आभार. पहिल्या आवृत्तीबरोबरच याही सुधारीत दुसऱ्या आवृत्तीचे वाचक स्वागत करतील, अशी आशा बाळगतो. धन्यवाद !

पुणे, महाराष्ट्र.
आषाढ शु. ९ शके १९४१, शिवशक ३४६.
दि. १० जुलै २०१९, डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांचा ५० वा पुण्यतिथी दिन.

– अनिकेत अंकुश यादव

❊ संपादकीय मनोगत ❊

दरवर्षी दिवाळीमध्ये आम्ही ऐतिहासिक युद्ध प्रसंगावर आधारीत देखावा करीत असतो. सन २०१५ च्या अशाच एका दिवाळीमध्ये आम्ही 'शिवाजी महाराजांची बसरूर स्वारी' या ऐतिहासिक प्रसंगावर आधारीत 'लाईट अँड साऊंड शो' साकारला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी फेब्रुवारी १६६५ मध्ये सध्याच्या कर्नाटक राज्यातील 'बसरूर' व इतर प्रमुख बंदरांवर स्वारी करून तेथील बंदरे व पेठा आपल्या ताब्यात घेतल्या होत्या. ही मोहीम भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाची आहे, कारण 'स्वतः राजाने नेतृत्व केलेली ही आरमारी मोहीम' होती. अशी मोहीम चोळ राजांचा एक अपवाद वगळता कोणाही राजाने केलेली नव्हती. अकराव्या शतकातील चोळ राजांनंतर भारतामध्ये नौदलाकडे/आरमाराकडे संरक्षणात्मक दृष्टीने लक्ष देणारा राजा झालेला नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांनी दि. २४ ऑक्टोबर १६५७ रोजी कल्याण, भिवंडी जिंकली व येथे मराठा आरमाराची मुहूर्तमेढ रोवली. या विशेष दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन आम्ही यादिवशी (२४ ऑक्टोबर) **'मराठा आरमार दिन'** साजरा करण्याची कल्पना मांडली. त्यास मोठा प्रतिसाद देखील मिळाला. इ.स. १६५७ मध्ये आरमाराच्या उभारणीची आखणी केल्यानंतर अवघ्या ८ वर्षांमध्ये इ.स. १६६५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या नवख्या आरमाराची परिक्षा घेण्याचे ठरविले आणि ही आरमारी मोहीम फत्ते केली.

उज्ज्वल नाविक परंपरा असणाऱ्या भारताच्या प्राचीन इतिहासात, नंतरच्या काळात मात्र नाविक सामर्थ्य लोप पावलेले होते. पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच, डेन्स इत्यादी युरोपीयनांच्या हातात आपला सागरी व्यापार व संबंध समुद्र गेलेला होता. भारतामध्ये अशी कोणतीही राजकीय सत्ता नव्हती की, जी या युरोपीयनांविरोधात कारवाई करेल. उलट भारतातील बलाढ्य मोगलांसह सर्वच सत्ताधाऱ्यांना आपले जहाज समुद्रामध्ये न्यायचे असेल तर या युरोपीयनांची परवानगी घ्यावे लागे, ते ही अनेक जुलुमी अटी स्विकारून. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिवाजी महाराजांनी अतर्क्य पौरूषत्व, अतुलनीय पराक्रम, अचाट साहस, गनिमी कावा आणि कल्पक बुद्धीचातुर्य या पंचसुत्रांच्या बळावर मराठा आरमार उभारले.... नव्हे तर ते अत्युच्च शिखरावर नेले.

'बसरूर मोहीम' च्या या विलक्षण घटनेस सन २०१५ मध्ये ३५० वर्षे पूर्ण झालेली होती. म्हणून आम्ही या मोहीमेवर आधारीत देखावा केला. मात्र या मोहीमेबाबतची फारशी माहिती आपल्या इतिहासात आढळली नाही, एवढेच काय तर आपल्या संपूर्ण भारताच्या आरमारी परंपरेची माहिती मला आपल्या इतिहासात फारशी आढळून आली

नाही. त्यामुळे आपसूकच मी 'आरमार' या विषयाकडे वळालो. आणि यास कारणीभूत होती, शिवाजी महाराजांची 'बसरूर मोहीम'. या मोहीमेची अधिक माहिती व्हावी, म्हणून एक छोटेखानी पुस्तिका देखील मी त्यावेळी प्रसिद्ध केली.

अशा या भारतीय आरमाराचा अभ्यास करताना, मला अनेकदा गोव्याचे ख्यातनाम इतिहास संशोधक डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर-शेणवी यांच्या ग्रंथांचा आधार घ्यावा लागला. किंबहुना डॉ. पिसुर्लेकर यांच्या ग्रंथांच्या आधाराशिवाय आपल्याला आरमाराचा अभ्यास करताच येत नाही, असे म्हणणे जास्त संयुक्तीक ठरेल. डॉ. पिसुर्लेकर यांचे 'पोर्तुगेज-मराठे संबंध', 'असेंतुश' चे खंड, 'पोर्तुगेज-इ-मराठाज' चे खंड, 'फोर्टालेझा' इत्यादी महत्त्वपूर्ण ग्रंथ पाहिल्यानंतर त्याची प्रचिती येते.

आरमाराबाबतची अनेक पुस्तके चाळताना, दुर्मिळ ग्रंथांचा शोध घेताना, आरमाराशी संबंधित वास्तूंचा अभ्यास करताना व ती साधने जमा करताना मला खूपच त्रास झाला. आत्ता बऱ्याचशा गोष्टी सहजसोप्या झालेल्या आहेत, जगभरातील बरीचशी दुर्मिळ साधने डिजीटल झालेली आहेत. इंटरनेटवर पाहिजे त्या गोष्टी चुटकीसरशी आपणांस मिळतात. मात्र डॉ. पिसुर्लेकर यांच्यासारख्या लोकांनी पुरेशा साधनसंपत्तीशिवाय केवढे अमौलिक काम केलेले आहे, हे पाहिले तर आपण अवाक् होतो.

अनेक इतिहासकारांना त्यांनी केलेल्या कार्याचा उचित मानसन्मान मिळालेला आहे तसेच अशा इतिहासकारांची माहिती देखील सर्वांना असते. मात्र डॉ. पिसुर्लेकर यांची माहिती आपल्याला नाही, याची मला खंत वाटत होती. त्यामुळे मी त्यांनी केलेल्या कामाची, लिहीलेल्या ग्रंथांची, त्यांच्या वैयक्तिक आयुष्याची माहिती माझ्या कुतूहलापोटी गोळा करायला लागलो. आणि मग 'Historians And Historiography In Modern India' या पुस्तकातील Dr. B. S. Shastry यांनी डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांच्यावरील लिहीलेला लेख माझ्या पाहण्यात आला. तसेच इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक व लेखक कै. प्रा. श. श्री. पुराणिक यांचे 'ऋषितर्पण' हे पुस्तक माझ्या पाहण्यात आले. या पुस्तकामधील डॉ. पिसुर्लेकर यांचा लेख माझ्या मनाला खूपच भावला. डॉ. पिसुर्लेकर यांनी किती हालअपेष्टा सहन करून त्यांनी आपले इतिहासकार्य पुढे नेले हे यातून मला कळाले, त्यांची छत्रपती शिवाजी महाराजांवरील अपार निष्ठा, त्यांचे मराठीप्रेम, देशनिष्ठा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, कामाप्रती असलेली त्यांची कर्तव्यनिष्ठा पाहून मी मनोमन डॉ. पिसुर्लेकर यांना माझे गुरूच मानले. आणि आपल्या या गुरूंबाबत काहीतरी करण्याच्या ध्येयाने मी झपाटून गेलो.

त्यातच पिसुर्लेकरांची माहिती वाचत असताना साधारण दोन-अडीच वर्षांपूर्वी माझ्या असे लक्षात आले की, सन २०१९ मध्ये डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांची १२५ वी

जयंती (३० मे) व ५० वी पुण्यतिथी (१० जुलै) येत आहे. त्यामुळे सन २०१९ मध्ये एखादा कार्यक्रम किंवा व्याख्यानमाला घ्यावी, असे मनात होते. त्यादृष्टीने मी फेसबुक व इतर माध्यमातून शिवप्रेमींना आवाहन देखील केले. नंतर माझ्या लक्षात आले की, पिसुर्लेकर यांचेवरील कार्यक्रम व व्याख्यानमाला आयोजीत करून केवळ कार्यक्रमास उपस्थित लोकांना एक दिवसाकरीता पिसुर्लेकर समजतील, पण पुढे काय? सर्वच इतिहासप्रेमींना पिसुर्लेकर यांच्या कार्याची माहिती होण्याकरीता त्यांच्यावरील छोटे चरित्रात्मक पुस्तक करावे, असे मी मनाशी पक्के केले. आणि मी पिसुर्लेकरांची वैयक्तिक माहिती, त्यांचा जीवनप्रवास, फोटो इत्यादी मिळविण्यास सुरूवात केली. मात्र काही केल्या त्यांची माहिती मिळत नव्हती. डॉ. पिसुर्लेकर हे गोव्यातले, पुण्यापासून फारच दूर. पुण्यातील मोजके इतिहाससंशोधक सोडले तर अन्य कोणासही त्यांचेबद्दल माहिती नाही. पिसुर्लेकर यांच्यावरील लेख लिहीणारे प्रा. श. श्री. पुराणिक यांचे देखील नुकतेच निधन झालेले होते. त्यामुळे पिसुर्लेकर यांची माहिती मिळणे दुरापस्त होऊन बसलेले.

डॉ. पिसुर्लेकर हे हाडाचे इतिहास संशोधक. 'पैसा, प्रसिद्धी आणि सत्कार' हे संशोधकांचे शत्रू असून खरे संशोधक कायम या शत्रूंपासून दूर राहतात, असे पिसुर्लेकरांचे ठाम मत होते. त्यामुळेच पिसुर्लेकर स्वतः प्रसिद्धीपासून दूर राहिले. फारसा गाजावाजा न करता त्यांनी १२५ हून अधिक ग्रंथ व लेख लिहीले आहेत. आणि त्यांच्या वैयक्तिक माहितीबरोबरच हे ग्रंथ व लेख देखील दुर्मिळ आहेत. हे मला जाणवल्यानंतर त्यांचे हे लेख गोळा करण्यास सुरूवात केली. पिसुर्लेकरांच्यावरील चरित्रात्मक लेखाबरोबरच त्यांनी लिहीलेले ग्रंथ–लेख यांची देखील माहिती या पुस्तकात समाविष्ट करावी असे मी ठरविले. त्यायोगे डॉ. पिसुर्लेकर यांच्या कार्याची चिरंतन स्मृती राहील व आपल्या कष्टाचेही चिज होईल. 'डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध करावा आणि त्याच्या पहिल्या भागात त्यांचेवरील चरित्रात्मक लेख असतील आणि दुसऱ्या भागात त्यांनी लिहीलेल्या लेखांचा समावेश असावा असे साधारण या स्मारक ग्रंथांचे स्वरुप ठरविले.

मराठा आरमाराचे अभ्यासक श्री. प्रतिश खेडेकर यांनी याबाबत मला मोलाची साथ दिली. त्यांच्याच सहयोगाने मी पिसुर्लेकर यांचे दुर्मिळ लेख शोधण्यास सुरूवात केली. आम्ही करीत असलेल्या धडपडीचे कौतुक आमचे पत्रकार मित्र श्री. प्रसाद पवार यांनी केले. त्यांनी दि. १२/७/२०१८ रोजीच्या 'दै. महाराष्ट्र टाईम्स' मध्ये 'पिसुर्लेकरांच्या दुर्मीळ लेखनाचे संकलन' या मथळ्याखाली एक लेख प्रसिद्ध केला. या बातमीमुळे आम्ही आजवर केलेल्या धडपडीचे चिज झाले आणि पुढेही अजून धडपड करावी असे वाटू लागले. या बातमीमुळे अनेक जणांनी कौतुक केले. ही बातमी पुण्याबरोबरच

महाराष्ट्रातील इतरही शहरांत छापून आली होती. ही बातमी वाचून गोव्याचे धडाडीचे अभ्यासक श्री. सचिन मदगे यांनी माझ्याशी संपर्क साधला. त्यांनी पिसुर्लेकरांची, गोव्याच्या इतिहासाची व गोव्यामधील किल्ल्यांची आम्हांला बरीच अज्ञात माहिती दिली. पिसुर्लेकरांचा एक फोटो देखील मला दाखविण्याकरीता ते गोव्यावरून पुण्यात घेऊन आले. ही बातमी वाचून, कोल्हापूरचे श्री. सुरेश शिखरे यांनी त्यांच्याकडील डॉ. पिसुर्लेकर यांनी लिहीलेला आणि सह्याद्री बाजीराव विशेषांकामध्ये प्रसिद्ध झालेला 'बाजीराव आणि पोर्तुगीज' हा लेख मला पाठवून दिला. या स्मारक ग्रंथातील उर्वरीत लेख श्री. प्रतिश खेडेकर व मी बऱ्याचशा दुर्मिळ ग्रंथांमधून शोधले.

डॉ. पिसुर्लेकर यांचे लेख या स्मारक ग्रंथांत समाविष्ट करण्यात अजून एक कायदेशीर अडचण होती ती म्हणजे, कॉपीराईटबाबतची. याची मला काहीच कल्पना नव्हती. श्री. प्रतिश खेडेकर, श्री. संदिप तापकीर, श्री. उमेश पुराणिक यांचेशी चर्चा केल्यानंतर मी ज्या ज्या ग्रंथांत पिसुर्लेकरांचे लेख प्रसिद्ध झालेले होते, त्यांच्या प्रकाशकांशी संपर्क साधून त्यांना पत्र, ई–मेल द्वारे याबाबतची कल्पना दिली. खरे पाहता, पिसुर्लेकरांचे प्रसिद्ध झालेले हे सर्व लेख साधारण १९५० सालापूर्वीचे होते. काही ग्रंथांचे प्रकाशक व इतर माहिती मिळत नव्हती. तर काही प्रकाशकांकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. मात्र भविष्यात कोणतीही अडचणी होऊ नये म्हणून हा खटाटोप करावा लागला.

डॉ. पिसुर्लेकरांवरील केवळ स्मारक ग्रंथापुरते काम न होता इतरही कार्यक्रम घेता येईल का, यासाठी मी प्रयत्नशील होतो. त्यासाठी शासन दरबारी देखील मी दाद मागण्याचे ठरविले. सर्वच बाजूंनी प्रयत्न करण्याचे ठरविले. काम फार कठीण होते. मात्र मनोमन मानलेल्या गुरूंबद्दलची निष्ठा मला शांत बसू देत नव्हती.

सर्वप्रथम, डॉ. पिसुर्लेकर यांनी लिहीलेले व पुणे विद्यापीठाने सन १९६७ मध्ये प्रकाशित केलेले 'पोर्तुगेज–मराठे संबंध' हे एकमेव मराठी पुस्तक पुर्नप्रकाशित करता येईल का? याबाबत काही ज्येष्ठ इतिहास अभ्यासकांशीही चर्चा केली. दि. १८/७/२०१८ रोजी पुणे विद्यापीठास मी स्वतः पत्र व ई मेल पाठवून हे पुस्तक पुन्हा प्रसिद्ध करावे अशी विनंती केली.

त्याबरोबरच डॉ. पिसुर्लेकर यांनी लिहीलेली पुस्तके पुर्नमुद्रित करावी व त्यांच्या १२५ व्या जयंती व ५० व्या पुण्यतिथीनिमित्त एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत गोवा विद्यापीठ, गोवा पुराभिलेख विभाग, गोवा सरकार व महाराष्ट्र सरकारला देखील दि. १८/७/२०१८ रोजी एक विनंतीपत्र पाठविले.

युवराज संभाजीराजे छत्रपती, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. रमेश जाधव व श्री. इंद्रजित सावंत, पोर्तुगीज भाषेचे अभ्यासक श्री. सयाजी साळोखे, श्री. सचिन

बोलाईकर यांची मी दि. १५/७/२०१८ रोजी कोल्हापूर येथे याबाबत भेट घेतली असता त्यांनी देखील त्यास चांगला प्रतिसाद दिला. त्याबाबत या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

शिवचरित्राचा व मराठा इतिहासाचा अभ्यास करताना सर्वच अभ्यासकांना पिसुर्लेकर यांचे ग्रंथ व लेख उपयोगी पडतात. त्यामुळे महाराष्ट्रातील काही ज्येष्ठ इतिहास अभ्यासकांना देखील या स्मारक ग्रंथांमध्ये त्यांचे लेख देण्याबाबत विनंती पत्र लिहीले.

डॉ. पिसुर्लेकर लिखीत 'पोर्तुगेज–मराठे संबंध' हे पुस्तक पुन्हा प्रसिद्ध करण्याबाबत दि. १८/७/२०१८ रोजी मी पुणे विद्यापीठाला पाठविलेल्या पत्रास काहीच उत्तर न आल्यामुळे मी पुन्हा दि. ८/१/२०१९ रोजी मा. कुलगुरु, पुणे विद्यापीठ यांना विनंतीपत्र पाठविले व डॉ. पिसुर्लेकरांच्या १२५ व्या जयंती व ५० व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने याचवर्षात (सन २०१९ मध्ये) हे पुस्तक प्रसिद्ध करावे अशी त्यांना पुनश्च विनंती केली. त्यानंतर पुणे विद्यापीठाचे मुद्रणालय विभागप्रमुख डॉ. कुटे यांचा फोन आला, आणि त्यांनी मला सांगितले की, 'आपण मागणी केलेल्या पोर्तुगेज–मराठे संबंध या पुस्तकाबरोबरच इतरही काही दुर्मिळ पुस्तके पुर्नप्रकाशित करण्यास कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे'. बऱ्याच वर्षांपासून हे पुस्तक अभ्यासकांना मिळत नव्हते, ते पुस्तक आता उपलब्ध होणार होते, आपण केलेल्या प्रयत्नास पुणे विद्यापीठाने योग्य प्रतिसाद दिल्याचे पाहून मला आनंद झाला. पुणे विद्यापीठ हे पुस्तक प्रसिद्ध तर करणार, हे ठरले. मात्र ते कधी करणार? हे मात्र काहीच कळाले नव्हते. सरकारी काम.... म्हणजे वेळ तर लागणार. असेच सर्व सांगत होते. त्यामुळे मला उगीच धास्ती भरली. आणि हे पुस्तक याच वर्षांत छापून विक्रीस उपलब्ध व्हावे यासाठी मी कुलगुरूंची प्रत्यक्षात भेट घेऊन विनंती करण्याचे ठरविले. दि. २५/३/२०१९ रोजी मी कुलगुरूंच्या कार्यालयात व पुणे विद्यापीठाचे मुद्रणालय विभागात भेट दिली व पुन्हा तसे एक पत्र त्यांना दिले. तेव्हा मुद्रणालय विभाग प्रमुख डॉ. कुटे सर यांनी मला या पुस्तकाची छपाई कधीच पूर्ण झाल्याचे सांगितले, केवळ प्रशासनाकडून या पुस्तकाची किंमत व वितरण व्यवस्था बाकी असून काही दिवसांतच ती प्रक्रिया पूर्ण होऊन पुस्तक बाजारात उपलब्ध होईल, असे सांगून मला आश्चर्याचा धक्काच दिला. एवढ्या तत्परतेने काम केल्याबद्दल मी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुद्रणालय विभाग व विद्यापीठ प्रशासनाचा अत्यंत ऋणी आहे.

दि. १८/७/२०१८ रोजी गोवा विद्यापीठ, गोवा पुराभिलेख विभाग, गोवा सरकार व महाराष्ट्र सरकार यांना मी पाठविलेल्या पत्रास काहीच उत्तर न आल्यामुळे मी दि. ८/१/२०१९ रोजी या सर्वांना पुनश्च विनंतीपत्र पाठविले व डॉ. पिसुर्लेकर यांनी

लिहीलेली पुस्तके पुर्नमुद्रित करावी व त्यांच्या १२५ व्या जयंती व ५० व्या पुण्यतिथीनिमित्त एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत त्यांना पुन्हा विनंती केली.

पुराभिलेख आणि पुरातत्व संचालनालय, गोवा सरकारच्या वतीने दि. २४/१/२०१९ रोजी एक परिपत्रक जाहीर होऊन, डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त गोवा विद्यापीठातील संशोधनार्थ्यांसाठी जुलै २०१९ मध्ये 'रिसर्च अँड मेथडोलॉजी' (Research and Methodology) या विषयावर कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे कळाले. त्याचबरोबर पिसुर्लेकर यांच्या कार्याविषयी संशोधनात्मक लेखांचा समग्रखंड तयार करण्याचेही सरकारने जाहीर केले. तसे दि. २५/१/२०१९ रोजीचे त्यांचे पत्र मला मिळाले. 'स्मरण एका इतिहास संशोधकाचे' हा पिसुर्लेकरांवरील माझा देखील एक लेख मी त्यांना पाठविला. डॉ. पिसुर्लेकरांनी सन १९२४-२५ ते सन १९६१ ला निवृत्त होईपर्यंत म्हणजे जवळपास ३७ वर्षे गोवा पुराभिलेख विभागात उत्कृष्ट काम केले. त्यामुळे गोवा पुराभिलेख विभाग व गोवा प्रशासनाने पिसुर्लेकरांच्या स्मरणदिनाच्या निमित्ताने करीत असलेल्या प्रयत्नांचा मला विशेष गौरव करावासा वाटतो.

डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांचे छोटे-मोठे लेख मिळत होतेच. मात्र पिसुर्लेकरांनी १२५ हून अधिक ग्रंथ व लेख लिहील्याचे माझ्या वाचनात आल्याने त्याची यादी कुठे मिळेल, याची मी चाचपणी करीत होतो. त्यातच श्री. प्रतिश खेडेकर यांनी पिसुर्लेकर यांनी लिहीलेल्या ग्रंथांची सूची गोवा विद्यापीठाने तयार केल्याचे सांगितले व त्या सूचीचे पहिले पान देखील मला पाठवून दिले. आता मी याचा शोध घेण्याच्या पुढील कामास लागलो. गोवा विद्यापीठाने प्रसिद्ध केलेली ही सूची ऑनलाईन उपलब्ध नव्हती. तेव्हा मी गोवा विद्यापीठाशी फोनवरून संपर्क साधला तेव्हा मला गोवा विद्यापीठ ग्रंथालयामध्ये ती सूची उपलब्ध असल्याचे कळाले. त्याची प्रत मला प्रति पान ५ रुपये दराने मिळेल असेही तेथून कळाले. माझा गोव्यातील मित्र श्री. अरूण सावंत याला मी तिथे प्रत्यक्षात जाऊन माहिती घेण्यास सांगितले. तेव्हा त्या सूचीचे तीन भाग असून ते त्याने विकत घेऊन मला पोस्टाने पाठवून दिले. 'Bibliography of Dr. Pissurlencar Collection' या नावाने डॉ. पिसुर्लेकर यांच्या सर्व कार्यावरील ३ भागांत ही इंग्रजी भाषेतील सूची गोवा विद्यापीठाने प्रसिद्ध केलेली असून हे महत्कठिण काम B. S. Shastry व V. R. Navelkar यांनी केलेले आहे. याच्या पहिल्या भागात डॉ. पिसुर्लेकर यांनी लिहीलेल्या १२३ ग्रंथ व लेखांची यादी असून त्याचा थोडक्यात सारांश त्यात दिलेला आहे. यामध्ये ८२ पोर्तुगीज, २८ मराठी, ११ इंग्रजी व २ फ्रेंच लेखांचा समावेश आहे. यातील मराठी लेख शोधण्याचा मी बराच प्रयत्न केला. यातील बरेचसे लेख भारतमित्र, विविधजनविस्तार, भारतसेवक इत्यादी मासिकांमध्ये छापून आलेले असून, यातील काही मासिके बंद झालेली आहेत,

तर काहींच्या जुन्या प्रती आत्ता उपलब्ध नाहीत. **काही जुन्या संशोधकांकडे हे लेख असल्यास अथवा काही जिज्ञासूंना काही लेख मिळाल्यास ते जर त्यांनी माझ्याकडे पाठवून दिले तर या ग्रंथांच्या पुढील आवृत्तीत त्याचा नक्की समावेश करता येईल. जेणेकरून पिसुर्लेकरांचा हा समग्र ग्रंथ खऱ्या अर्थाने पूर्णत्वास येईल.**

गोवा विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या डॉ. पिसुर्लेकर यांच्या ग्रंथसूचीच्या दुसऱ्या भागात डॉ. पिसुर्लेकरांनी जमा केलेले दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखीते, नकाशे, नक्कला, मायक्रोफिल्मस् इत्यादी जवळपास ४००० हून अधिक साहित्यांची विषयानिहाय सूची यात दिलेली आहे. तसेच तिसऱ्या भागात जगभरातील मान्यवरांनी डॉ. पिसुर्लेकर यांना पाठविलेल्या २२९ पत्रांचा समावेश आहे.

ही ग्रंथसूची हातात पडल्यानंतर डॉ. पिसुर्लेकर यांची स्वतःची ग्रंथसंपदा व त्यांनी जगभरातून जमविलेले दुर्मिळ ग्रंथ व इतर साहित्य पाहण्याची मला तीव्र इच्छा झाली. हे ग्रंथ पाहण्याची परवानगी मिळावी म्हणून मी गोवा विद्यापीठाचे कुलगुरू, कुलसचिव, ग्रंथालय प्रमुख इत्यादींना ई मेल द्वारे कळविले. दि. २४ ते २७ जानेवारी २०१९ रोजी राहूल पापळ, चेतन घाडगे व मी असे आम्ही तिघेजण गोव्यास गेलो. गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालय विभागाने डॉ. पिसुर्लेकर यांचे दालन स्वतंत्र ठेवलेले असून त्यांचा हा सर्व अमौलिक ठेवा त्यांनी व्यवस्थितरित्या जतन करून ठेवलेला आहे. मात्र हे सर्व पाहण्यासाठी अनंत अडचणी आल्या. मात्र या सर्वांवर मात करून आम्ही हे दालन पाहण्यासाठी आग्रही होतो. तेथील लोकांनीही त्यांचा एक कर्मचारी मदतीला देऊन आम्हांला हे सर्व दालन दाखविले.

डॉ. पिसुर्लेकरांच्या या दालनात आम्ही तहानभूक विसरून गेलो. लहान मुलाला खेळण्याने भरगच्च भरलेल्या दुकानात सोडल्यानंतर जी अवस्था त्या मुलाची होते, तीच अवस्था या दालनात आल्यानंतर आमच्या तिघांची झाली. सध्या येथे कोणीही येत नसल्याने येथे बरीचशी धूळ जमा झाली होती. Antigualhas चे खंड, Assentos do Conselho do Estado चे खंड, Portugueses e Maratas चे खंड, Maratas em Bacaim, गोव्याचे ख्रिस्तीकरण, माधवराव पेशव्यांचा पोर्तुगीज वैद्य, निवृत्तेश्वरीचा शोध, ब्रह्मपुरी, शिवाजीची बार्देजवरील स्वारी, युरोपामध्ये पहिल्यानेच मराठीत छापलेले पुस्तक, गोमंतकातील एक धर्मांतर प्रकरण इत्यादी पिसुर्लेकरांचे ग्रंथ व लेख आम्ही येथे स्वतः हातात घेऊन पाहिले. पिसुर्लेकरांनी जमविलेली अनेक दुर्मिळ हस्तलिखीतेही आम्ही येथे पाहिले. कॉस्म द गार्दा याने लिहीलेले पोर्तुगीज भाषेतील शिवचरित्र पाहिल्यानंतर तर आमच्या आनंदाला पारावार उरला नाही. कोकणाख्यान हे दुर्मिळ हस्तलिखीत, फादर स्टिफन्स यांचे ख्रिस्तपुराण, मराठा क्षत्रिय समाजाचा (वंश, गोत्र इत्यादींसह)

संक्षिप्त इतिहास व इतर अनेक दुर्मिळ ग्रंथ, लेख, हस्तलिखीते, कार्ताझ, नकाशे इत्यादी येथे पाहिले. ग्रंथालय बंद करायची वेळ झाल्यानंतरच आम्ही तेथून उठलो. हे दालन मला पहायला मिळाले, याकरीता गोवा विद्यापीठाचे जॉईंट रजिस्ट्रार श्री. डोनाल्ड ए. ई. रॉड्रिग्स, श्री. निखील लवंदे, श्री. सचिन मदगे, श्री. विनय मडगावकर यांनी जी मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी राहील. तसेच गोवा विद्यापीठ व ग्रंथालय विभागाचाही मी आभारी आहे.

गोव्याला जाण्यापूर्वी मी गोव्यामधील विविध ग्रंथालये, गोमंतक मराठी अकादमी, डॉ. पिसुर्लेकर यांचे नातेवाईक इत्यादींची माहिती इंटरनेटद्वारे काढून त्यांच्याशी संपर्क करून ठेवलेला होता. त्यापैकी कृष्णदास शामा गोवा स्टेट सेंट्रल लायब्ररीचे प्रमुख श्री. फर्नांडीस यांचेशी फोनवरून संपर्क साधला असता, त्यांनी माझ्या कामाचे कौतुक केले व बरीचशी माहिती देऊ केली. गोवा भेटीत आम्ही त्यांना भेटलो. फर्नांडीस यांच्या पुढाकाराने हे ग्रंथालय भारतातील सर्वोत्कृष्ट झालेले आहे. संपूर्णपणे वातानुकुलीत असलेल्या या ग्रंथालयात अनेकविध विषयांची विपुल ग्रंथसंपदा आहे, याशिवाय सर्वांत वरच्या मजल्यावरील भागात अनेक दुर्मिळ हस्तलिखीते, पोथ्या, नकाशे, कार्ताझ (समुद्री प्रवासाचा परवाना) व्यवस्थितरित्या जतन करून ठेवलेले आहेत. गोव्याचे आद्यकवी कृष्णदासा शामा यांनी लिहीलेले श्रीकृष्ण चरित्र देखील येथे जतन करून ठेवलेले आहे. कोणतीही व कसलिही ओळख नसतानाही श्री. फर्नांडीस यांनी अत्यंत आत्मियतेने आम्हांला सर्व ग्रंथालय फिरून पिसुर्लेकरांचे व अन्य दुर्मिळ ग्रंथ दाखविले. श्री. फर्नांडीस यांनी केलेल्या सहकार्यामुळे व दिलेल्या प्रोत्साहनामुळे हा ग्रंथ पूर्ण होत आहे, हे मला येथे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते.

आपल्या सिद्धहस्त लेखनीतून गेल्या अनेक वर्षांपासून वाचकांना भुरळ घालणारे, मराठ्यांच्या इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक श. श्री. पुराणिक यांचा डॉ. पिसुर्लेकरांवरील लेख वाचल्यामुळे पिसुर्लेकर हे व्यक्तिमत्व माझ्या मनात घर करून बसलेले होते. एकदा मी पुराणिक सरांना भेटलेलो देखील होतो. परंतु प्रकृती बरी नसल्याने फार वेळ बोलता आले नव्हते, नंतर त्यांचे दुःखद निधन झाले. पुराणिक सरांनी डॉ. पिसुर्लेकर यांचे बरेचसे लेख गोळा केलेले होते. गोव्याला स्वतः जाऊन पिसुर्लेकरांवरील बरीचशी माहिती देखील त्याकाळी मिळविली होती. पुराणिक सर हयात असते, तर प्रस्तुत स्मारक ग्रंथामध्ये त्यांच्याजवळील बराचश्या माहितीचा समावेश करता आला असता. श. श्री. पुराणिक यांचे सुपुत्र श्री. उमेश पुराणिक यांनी मला प्रस्तुत ग्रंथाकरीता वेळोवेळी सहकार्य केले. ग्रंथलेखन, प्रकाशन व त्याचे वितरण याच्या सद्यस्थितीची कल्पना दिली. तसेच श. श्री. पुराणिक लिखीत 'ऋषितर्पण' या ग्रंथातील डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

यांचेवरील सुंदर लेख या स्मारक ग्रंथात प्रसिद्ध करण्यास श्री. उमेश पुराणिक यांनी आनंदाने होकार दिला, त्याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांनी प्रसिद्ध केलेल्या 'शिवचरित्र प्रदिप' या ग्रंथात डॉ. पिसुर्लेकर यांचा 'शिवाजी व पोर्तगीज' हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. हा लेख प्रस्तुत स्मारक ग्रंथात प्रसिद्ध करण्याकरीता मंडळाचे अध्यक्ष श्री. भावे यांनी तात्काळ संमती दिली. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रस्तुत स्मारक ग्रंथात समाविष्ट लेखांसाठी डॉ. बी. एस. शास्त्री, सह्याद्री विशेषांक, इंडियन हिस्ट्री काँग्रेस, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मांडवी, सह्याद्री, विविधज्ञानविस्तार, गोवा विद्यापीठ, गोवा विद्यापीठ ग्रंथालय विभाग यांच्या ग्रंथांचा उपयोग झाला, त्यांचाही मी खूप खूप आभारी आहे.

त्याचबरोबर ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. ग. भा. मेहेंदळे (पुणे) व श्री. इंद्रजित सावंत (कोल्हापूर) तसेच पुण्याचे माजी खासदार श्री. प्रदिपदादा रावत या मान्यवरांचा देखील मी विशेष आभारी आहे.

आपल्या व्यस्त कामामधून वेळात वेळ काढून श्री. माणिक काळे यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठाचे डिझाईन करून दिले व चित्रकार मित्र श्री. सागर साळुंके यांनी मुखपृष्ठावरील डॉ. पिसुर्लेकर यांचे चित्र काढून दिले त्याबद्दल त्यांचे आभार. मुक्ता साबडे, सोनाली जरांडे व मानसी वडके यांनी या पुस्तकातील काही लेख टाईप करून दिले यासाठी त्यांचे आभार.

डॉ. पिसुर्लेकर यांचे फोटो सुरूवातीला काही केल्या मला मिळत नव्हते. इंटरनेटवर त्यांची दोन ब्लॅक अँड व्हाईट चित्रे होती. ती छपाईकरीता उत्तम दर्जाची नव्हती. त्यांची दोन चित्रे मला गोवा विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या सूचीमध्ये मिळाली. मांडवी व सह्याद्री या मासिकांनी छापलेल्या पिसुर्लेकरांच्या लेखामध्ये त्यांचा ब्लॅक अँड व्हाईट फोटो होता. याशिवाय गोव्याचे श्री. सचिन मदगे यांनी डॉ. पिसुर्लेकरांचा ब्लॅक अँड व्हाईट मला दिला होता. हे सर्व फोटो छपाईकरीता योग्य नव्हते, त्यांचा कलर फोटो आवश्यक असल्याने डॉ. पिसुर्लेकर यांचे एक चित्र काढून घेतले. तसेच कव्हरच्या मागील बाजूस ही सर्व ब्लॅक अँड व्हाईट चित्रे देखील छापलेली आहेत. श्री. सागर साळुंके, श्री. सचिन मदगे व वरील सर्व मासिकांचा देखील मी ऋणी आहे.

डॉ. पिसुर्लेकर यांनी लिहीलेल्या १२३ ग्रंथ व लेखांचा इंग्रजी भाषेतील सारांश गोवा विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या सूचीमध्ये मला मिळालेला होता. मात्र त्याचे मराठी भाषांतर करण्याचे महत्कठिण काम अनेकांना सांगूनही होऊ शकले नव्हते. एक तर यातील शब्द उच्चकोटीचे, क्लिष्ट व ऐतिहासिक होते. त्याचा नीट मेळ बसत नव्हता.

त्यामुळे भाषांतराचे काम अनेक लोकांना देऊन त्यांनी ते तसेच ठेवले होते. शेवटी–शेवटी हे काम माझेच शिरावर आले. एकतर पहिल्यापासून मला इंग्रजी भाषेची जाम भिती. मात्र भाषांतर तर मलाच करावे लागणार होते. अनेक रात्री जागून पहिली इंग्रजीची भिती घालवली. अखेर मदतीला धावून आला तो म्हणजे सर्वांचा जीवाभावाचा – 'गुगल'. इंटरनेटच्या साथीने भाषांतराचे काम बऱ्यापैकी जमून आले. शिवाय, यातून एक फायदा असा झाला की, माझे इंग्रजीचे ज्ञान देखील वाढले. मात्र इंटरनेटद्वारे झालेले भाषांतर हे शब्दशः झालेले होते, त्यामुळे त्या वाक्यरचनेत थोड्याबहुत चुका होत्या. आमचे मित्र श्री. चंद्रशेखर गोखले यांनी माझ्यासोबत रात्री अपरात्री बसून, यातील काही चुका तपासून दिल्या, त्यांचे आभार मानने अगत्याचे आहे. तरीदेखील भाषांतरामध्ये काही पोर्तुगीज शब्द व काही वाक्यांचे अर्थ यांमध्ये काही चुका वाचकांच्या नजरेस आल्या, तर त्या मला कळवाव्यात. पुढील आवृत्तीमध्ये त्या दुरूस्त करण्यात येतील.

श्री. अरुणकुमार वाडेकर यांनी पुस्तकाचे शुद्धलेखन तपासले त्यांचेही खूप खूप आभार.

हा स्मारक ग्रंथ डॉ. पिसुर्लेकर यांच्या १२५ व्या जन्मदिनी म्हणजेच दि. ३० मे २०१९ रोजी प्रसिद्ध करावे, असे ठरविले होते. शेवटशेवटपर्यंत पुस्तकात काही ना काही चुका निघतच होत्या. कोणतीही चूक राहू नये या उद्देशाने मी देखील त्या दुरूस्त करीतच होतो.

मी काही फार मोठा इतिहास संशोधक नाही किंवा मला इतिहास अभ्यासाचा वारसाही लाभलेला नाही. अत्यंत कष्टप्रद जीवन जगून, काबाडकष्ट करून मी माझे कुटुंब व व्यवसायाचा भार सहन करीत करीत, माझ्या आवडीचा विषय म्हणून मी किल्ले भटकंती, शिवप्रेम व आरमारावरील अभ्यासाकडे वळालो. आणि आजवर प्रामाणिकपणे काम करीत राहिलो. आपण ज्या विषयात काम करतो त्यात झपाटून काम करणाऱ्या गुरूजनांच्या देखील ऋणात राहिले पाहिजे, असे माझे वैयक्तिक मत. भारतातील किल्ल्यांचे व क्रांतिकारकांचे अभ्यासक व माझे गुरू कै. प्रमोद मारूती मांडे यांच्या विचारांनी मी या क्षेत्राकडे वळालो. दुर्दैवाने प्रमोद मांडे यांचे दि. १७/१०/२०१७ रोजी कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने दुःखद निधन झाले. डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर हे देखील कॅन्सरमुळेच गेले. शिवाय हे दोघेही कोणताही गाजावाजा न करता, आपले काम प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि तत्परतेने करीत होते. डॉ. पिसुर्लेकर यांचा कोणताही सहवास मला लाभला नाही की, ते माझे नातेवाईक नाही, की पिसुर्लेकर यांनी जाताजाता मला काही देऊनही गेलेले नाही. व्यावहारिक हेतूने, मी त्यांचा स्मारक ग्रंथ करावा असे काहीच कारण नाही. केवळ आणि केवळ पिसुर्लेकर यांनी ज्या निष्ठेने काम केले त्यांच्याप्रती असलेला माझा

आदरभाव म्हणून मी हा स्मारक ग्रंथ करण्याचे ठरविले. यातून मला कोणत्याही आर्थिक वा अन्य स्वरुपाच्या फायद्याची अपेक्षा नाही. अत्यंत पदरमोड करून मी यातील बऱ्याचश्या गोष्टी, लेख जमा केले. ते केवळ पिसुर्लेकर यांच्यावरील प्रेमापोटी. त्यामुळेच मी या ग्रंथाची छापील प्रत व पी.डी.एफ. स्वरुपातील इंटरनेटवरील प्रत अत्यंत माफक दरात देणार आहे. यामागे आणखी एक कारण होते, या स्मारक ग्रंथाचे छपाईसाठी मला प्रकाशक मिळाला नाही. पुस्तक विकत घेऊन वाचण्याची परपंरा आता कमी होत चाललेली आहे, त्यात जर पुस्तक ऐतिहासिक असेल तर मग कोण वाचणार? म्हणून मला योग्य प्रकाशक मिळाला नसल्याने शेवटी मीच ते पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचे ठरविले.

या धावपळीत माझ्या हातून काही चुकाही झाल्या असतील, त्याबद्दल मला सर्वांनी क्षमा करावी. अनेकांच्या सहकार्यामुळेच मला हे करता आले. त्या सर्वांचे पुनश्च मनःपूर्वक आभार!


आणि काही विशेष व्यक्तींचे आभार मानने, मला अगत्याचे वाटते. ते म्हणजे, माझी एकुलती एक पत्नी सौ. अंजली, मुलगी कु. अदिती व मुलगा कु. अदिराज यांचे. ते यासाठी की, कोणतीही आडकाठी न आणता, भांड्याला भांड न लागता, त्यांनी मला या पुस्तकाचे काम करण्यासाठी मोकळीक दिली. अन्यथा व्यवसायाच्या अत्यंत व्यस्त व्यापातून व संसाराच्या गाड्यातून हे पुस्तक पूर्ण करणे म्हणजे दिव्यच होते.

पिसुर्लेकर त्यांच्या अखेरच्या काळातील एका कार्यक्रमप्रसंगी असे म्हणाले होते, ''मी जी जी कागदपत्रे जगभरातून जमविली, ती सर्व मुंबई विद्यापीठाच्या पणजीच्या केंद्रात (सध्या गोवा विद्यापीठ ग्रंथालयात) ठेवली आहेत. एकही कागदाचा कपटा मी माझ्या घरात ठेवलेला नाही. जे साहित्य मी जमविले आहे, त्याचा नवीन पिढीने उपयोग करावा.'' डॉ. पिसुर्लेकर यांनी लिहीलेले बरेचसे ग्रंथ हे पोर्तुगीज भाषेत आहेत, ते इंग्रजी अथवा मराठी भाषेत भाषांतर करण्याची गरज आहे. अनेक युवा इतिहास संशोधकांनी हे आव्हान स्विकारावे आणि आपल्या इतिहासात मोलाची भर घालावी.

धन्यवाद !

पुणे, महाराष्ट्र.
वैशाख कृ. ११ शके १९४१, शिवशक ३४५. दि. ३० मे २०१९.
(डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांचा १२५ वा जन्मदिन)

– अनिकेत अंकुश यादव



डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर स्मारक ग्रंथ

Dr. Pandurang Pisurlencar Commemoration Book

तृतीय आवृत्ती (Third Edition)

दुर्मिळ लेखांचे संकलन असलेला ग्रंथ

डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर हे भारतातील ख्यातनाम इतिहास संशोधक व लेखक. त्यांच्या **१२५ व्या जयंती** व **५० व्या पुण्यतिथी**च्या निमित्ताने २०१९ मध्ये **स्मारक ग्रंथ** तयार करण्यात आलेला होता. त्याची तृतीय आवृत्ती आता प्रसिद्ध झाली आहे.

तीन भागातील ३७५ पानांच्या या स्मारक ग्रंथात त्यांचेवरील **४ चरित्रात्मक लेख,** त्यांनी लिहीलेले **२२ दुर्मिळ लेख** व त्यांच्या **१३९ ग्रंथ व लेखांचा सारांश** आहे. याशिवाय डॉ. पिसुर्लेकर यांची काही दुर्मिळ चित्रे देखील यात आहेत.

अवाढव्य काम करणारे डॉ. पिसुर्लेकर मात्र आज काही अंशी उपेक्षित आहेत. त्यांच्या साहित्याबरोबरच त्यांची वैयक्तिक माहितीची देखील फारशी कोणास माहिती नाही. डॉ. पिसुर्लेकर यांनी लिहीलेल्या ग्रंथांद्वारे पोर्तुगीज व भारतातील सत्ताधाऱ्यांमधील संबंधांवर प्रकाश पडतो. यापैकी पोर्तुगीज–मराठा संबंधांवर तर अनेक माहिती नव्याने कळते. शहाजीराजांपासून ते पेशव्यांपर्यंत व इतर अनेक मराठा सरदार यांच्याबद्दलची अनेक अपरिचित माहिती पिसुर्लेकरांच्या ग्रंथांमधून बाहेर येऊ शकेल.

त्यामुळेच प्रस्तुत स्मारक ग्रंथ हा संदर्भाकरीता आपल्या संग्रही असणे महत्त्वाचे आहे.

किंमत रू. **400**/-

या ग्रंथासाठी येथे संपर्क साधा –

श्री. अनिकेत यादव–४१७, शुक्रवार पेठ, खडक पोलीस स्टेशन समोर, शिवाजी रोड, पुणे ४११००२. मोबा. **7588291483. Email - aniketyadav84@gmail.com**